सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
गणेशखिंड, पुणे-४११००७, भारत.
Savitribai Phule Pune University
(formerly University of Pune)
Ganeshkhind, Pune-411007, India.

प्रा. नितीन र. करमळकर
कुलगुरू
Prof. Nitin R. Karmalkar
Vice Chancellor

दूरध्वनी : (कार्यालय) ०२०-२५६२१०१७
Telephone : 020-25621017
E-mail : puvc@unipune.ac.in

# *आवाहन*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेना तसेच सर्व महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागातील आजी-माजी सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यापीठाशी संलग्नित सर्व प्राचार्य, संचालक व इतर अविभाज्य घटकांना विनम्र आवाहन करण्यात येत आहे की कोविड १९ महामारीचे अतिशय भयावह रूप दिवसेंदिवस समोर येत असून रुग्णांच्या जीविताशी संबंधित अनेक गोष्टींचा तुटवडा व कमतरता भासू लागली आहे. आपली आरोग्ययंत्रणा दिवसेंदिवस भक्कम होत असली तरी ज्या गोष्टी तयारच करता येत नाहीत आणि जे दान देशातील तरुणांजवळ मुबलक प्रमाणात आहे ते म्हणजे रक्तदान आणि प्लाझ्मादान, त्याची आजच्या काळातील मोठी गरज ओळखून आपण सर्वांनी ह्या बिकट परिस्थितीत रक्त व प्लाझ्मा दानासाठी अग्रक्रमाने व उत्साहाने पुढे यायला हवे. रक्तदानाची शिबिरे महाविद्यालय पातळीवर आयोजित होत आहेत ही अतिशय महत्वाची गोष्ट असून ह्याच अनुषंगाने प्लाझ्मा दानासाठी आता व्यापक मोहीम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठाने आजवर अनेक प्रकारे कोविडच्या संदर्भात आपले योगदान दिले आहे आणि ह्याही पुढील काळात हा कृतीपूर्ण सहभाग आपल्या सर्वांच्या सहकार्याने सुरू राहील अशी खात्री वाटते. देशव्यापी लसीकरणाची गती वाढेल आणि सर्व तरुण लसीकरणाचे लाभार्थी होतील परंतु ह्या लसीकरणानंतर कोणत्याही इच्छुक दात्याला आपले रक्त वा प्लाझ्मा किमान ३० दिवस दान करता येणार नाही, ही वैद्यकीय अपरिहार्यता लक्षात घेऊन मी आपल्या सर्वांना आवाहन करीत आहे की, जे कोणी कोविडमधून सुखरूप बाहेर आले आहेत आणि ४२ दिवसांचा कालावधी पूर्ण केला आहे आणि जे प्लाझ्मा देऊ शकतात अशा सर्वांनी तत्काळ प्लाझ्मा दानाचा अत्यंत मोलाचा संकल्प करून प्लाझ्मा दान करावे आणि मगच लस घ्यावी. ह्यासाठी आपले नाव खाली दिलेल्या गुगल फॉर्ममध्ये नोंदवावे म्हणजे महाराष्ट्रातील सर्व कोविड रुग्णांसाठी प्लाझ्मा उपलब्ध होणारी एकत्रित संचयिका तयार होईल. शिवाय ही प्लाझ्मा दात्यांची सूची समाजातील सर्व कोविड रुग्णांसाठी आणि सर्व वैद्यकीय विभागांना खुली राहील. त्यामुळे विद्यापीठाच्या सर्व घटकांना पुन्हा एकदा आवाहन करत आहे की, ह्या प्लाझ्मा दान मोहिमेत आपणही सहभागी व्हावे आणि आपल्या संपर्कातील प्रत्येकाला ह्यासाठी प्रोत्साहित करून सहभागी करून घ्यावे.*

**shorturl.at/cpyDO**

प्रा. नितीन र. करमळकर
कुलगुरू

*संदर्भ : व्हीसी / 151*
*दिनांक : 29/ 4/ 2021*